Exh. 8

Order
Read and Recorded

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.04.01 12:50:33 +0530

(3)

## को.वि. दिवाणी न्यायधिश, कनिष्ठ स्तर, कळमेश्वर

एम.जे.सी. नं. ७/२०२६ पेशी ता. ~~२६/३/२०२६~~ 1/4/26

**श्री. जयसिंग रामाजी धोटे**

— विरूध्द —

**निरंक**

**<u>अर्जदार यांचा शपथेवर सरतपासणी बयाण/प्रतिज्ञालेख</u>**

**अर्जदाराचा शपथेवर सरतपासणी बयाण/प्रतिज्ञालेख येणेप्रमाणे :—**

१) असे की, मी अर्जदार मुळचा सावनेर येथील राहणारा असून वरील पत्यावर राहत आहे. असे की मी अर्जदाराची सख्खी बहीण श्रीमती नानुबाई रामाजी धोटे उर्फ नानुबाई संतोषराव कडू ही दिनांक १३/०६/२०१९ रोजी काटोल येथे मरण पावली असून तिचे पती नामे संतोष विठोबाजी कडू हे दिनांक २०/१/२०१७ रोजी काटोल येथे मरण पावले तर त्यांचा मुलगा नामे हेमराज संतोषराव कडू हा दि. ११/१०/२०१२ रोजी पंचवटी काटोल येथे अविवाहीत मरण पावला. असे की, त्यांना अपत्य नव्हते, त्यांची देखभाल व सांभाळ मी अर्जदारच करीत होतो.

२) असे की, मी अर्जदार व मृतक बहीण नानुबाई उर्फ नानी यांच्या संयुक्त नावाने मौजा— निळगांव प.ह.नं. येथे सर्व्हे न. २३२ आराजी १.४३ हे.आर., जमा रूपये ११.६५, भो.व. १ शेतजमीन आहे. असे की, मृतक नानुबाई यांना तिच्या सासरचे कोणतेही वारसांन नसल्याने त्यांचे एकमेव वारस मी अर्जदार आहोत. सदर मालमत्ता ही महसुल विभाग तहसिल कार्यालय कळमेश्वर अंतर्गत येत असल्याने त्या मालमत्तेच्या फेरफार संदर्भात वारसांन प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदर प्रकरण दाखल करण्यात आले आहे.

दिवाणी व फौजदारी न्यायालय कळमेश्वर जि.नागपूर